महा मेट्रो

PUNE METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे प्रकल्प

प्रेस नोट : मुंबई दिनांक:- ३१ ०१/२०२०

**पुणे मेट्रो प्रकल्प साठी लागणाऱ्या वित्त पुरवठ्याचे नियोजन पूर्ण : महा मेट्रो व युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँक यांच्यात माननीय श्री उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत प्रकल्प वित्त पुरवठ्याच्या करारावर स्वाक्षऱ्या**




पुणे मेट्रो रेल प्रकल्प हा महत्वाकांक्षी नागरी वाहतुक सुविधा प्रकल्प असून, सदरचा प्रकल्प महामेट्रोमार्फत ५०:५० टक्के केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त भागीदारीमध्ये राबविणेत येत आहे. सदरचा प्रकल्प हा उत्तम दर्जा, सुरक्षितता व पर्यावरणाचे पालन करून राबविणेत येत आहे. सदरचा प्रकल्प हा पुणे व पिंपरी- चिंचवड येथील नागरिकांच्या सोयीसाठी अंतराष्ट्रीय दर्जाचे वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणार आहे

महा मेट्रो  दोन प्रकल्प राबवत आहे . नागपुर मेट्रो रेल प्रकल्प हा १८ फेब्रवारी, २०१५ मध्ये ३८ कि.मी. मार्गिकेचा असून त्यामध्ये ३८ स्टेशन नियोजित करणेत आलेले आहेत. त्याचप्रमाणे पुणे मेट्रो रेल प्रकल्प २३ जानेवारी, २०१७ रोजी कार्यान्वित करणेत आलेला असून सदरचा प्रकल्प हा ३२.५ कि.मी. मार्गिकेचा असून त्यामध्ये ३० स्टेशन समाविष्ट करणेत आलेले आहेत. सदरचा प्रकल्पाचा एकूण प्रकल्पाचा खर्च रू. ११,४२० कोटी इतका अपेक्षित आहे.

प्रकल्पाचा खर्च ५,८३१ कोटी इतका खर्च परिकल्पित करणेत आलेला आहे. महामेट्रो प्रकल्प हा केंद्र शासन व राज्य शासन यांच्या सहाय्याने अे.एफ.डी. फ्रान्स व युरोपियन इनव्हेस्टमेंट बँकेमार्फत आर्थिक कर्ज उपलब्ध करणेत येणार आहे.




दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी  महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित व युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँक (ई.आय.बी) चे  उपाध्यक्ष  श्री. बी. अँन्ड्रयू मॅकडॉवेल यांचेमध्ये  प्रकल्पाच्या खर्चाचा पहिला हप्ता युरो २०० दशलक्ष ( रू. १६०० करोड) याबाबतचा करारनामा  माननीय श्री उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री  , महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत स्वाक्षरीत करण्यात आला. या प्रसंगी माननीय एकनाथ शिंदे, शहरी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री यूगो अस्थुतो, युरोपिअन युनियन चे भारतातील अँबेसेडर ,  युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँकचे अधिकारी व  महामेट्रोचे संचालक श्री रामनाथ, श्री सिवमाथंन, श्री हेमंत सोनावणे हे उपस्थित होते. सदर कर्जाची रक्कम सिव्हील वर्क (अंडरग्राऊँड) व डेपोच्या कामासाठी खर्च करणेत येणार आहे.

या प्रसंगी मुख्यमंत्री महोदयांनी पुणे मेट्रोच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आणि म्हणाले पुणे मेट्रोचा विकास म्हणजे पुण्याचा विकास. मुख्यमंत्री महोदयांनी युरोपिअन इन्व्हेस्टमेंट बँक यांच्या पदाधिकाऱ्यांना नाशिक मेट्रो साठी व पर्यावरण संवर्धनाच्या प्रकल्पांसाठी अर्थ सहाय्य करण्यासाठी विनंती केली

पुणे मेट्रोचे काम अत्यंत वेगाने चालले असून आतापर्यंत ३७ टक्के काम पूर्ण झाले आहे.

/हेमंत सोनावणे

महाप्रबंधक जनसंपर्क पुणे मेट्रो

९३०९५२६०९६